म. ग्र. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९९८.
१९२०

कैलासवासी

य बाळ गंगाधर टिळक

यांच्या चरणांवर वाहिलेला

# तिलकाञ्जलि

लहान मराठी काव्य

---

लेखक

## लक्ष्मण गणेशशास्त्री लेले

---

झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा !
मोरोपंत.

---

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण
बुधवार— चौक, पुणें सिटी.

REFBK-0001812
REFBK-0001812

शा. श. १८४२. ] किं. चार आणे. [ इ. स. १९२०.

# तिलकाञ्जलि

दा. क्र. १८१२

रचणार

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले

REFBK-0001812
REFBK-0001812

पुस्तक मिळण्याचें ठिकाण
नवीन किताबखाना, बुधवार–चौक, पुणें सिटी.

शा. शक १८४२; इ. स. १९२०.

हें पुस्तक पुणें येथें **आर्यभूषण** छापखान्यांत रा. रा. **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापिलें व रा. रा. **लक्ष्मण गणेशशास्त्री लेले** यांनीं, कनाळे बंगला, स्टेशनरोड, सोलापूर, येथें प्रसिद्ध केलें.

---

( पुस्तकाचे सर्व हक्क लेखकांनीं स्वतांकडे राखून ठेविले आहेत. )

# अश्रुबिंदु !

त्रैलोक्यदीपके देवे लोकान्तरमुपेयुषि
तमस्तान्तमभूद्विश्वं कः सुखी महदापदि !

कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या कीर्तिरूप देहावर प्रस्तुत तिलकाञ्जलि मीं प्रेमपुरःसर वाहिला आहे. हा अञ्जलि कोणत्या स्थितींत व कसा जन्मास आला यासंबंधानें चार शब्द लिहिणें आवश्यक आहे.

मधुमेहानें शरीरांत ठाणें दिलेलें; कौटुंबिक आपत्तीनें, जवळच्या कित्येक इष्टमित्रांच्या अकाल विरहानें व अन्यही उपाधींनीं मन व्यग्र होऊन होरपळून गेलेलें; शीतज्वरानें पछाडल्यामुळें शरीर पिळवटून निवालेलें; अशा स्थितींत पुणें शहर सोडून मी सोलापूर येथें हवापालट करण्याकरितां आलों. या गोष्टीला आठ महिने लोटले. इतक्या अवधींत शरीराला थोडासा आराम वाटला. पण मन उदासीन व कष्टीच होतें. अशा रीतीनें दिवस कंठीत असतां तारीख पहिली ऑगस्ट इ. स. १९२०, रविवाररोजीं सकाळीं नऊ वाजतां 'महाराष्ट्राचे अनभिषिक्त राजे,' अद्वितीय देशभक्त व अत्यंत तेजस्वी विद्वद्रत्न लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या निधनाची अत्यंत कर्णकटु व अशुभ वार्ता विद्युज्जवानें येथें येऊन थडकली ! तिनें माझें अंतःकरण शतधा विदीर्ण करून सोडलें ! लोकमान्यांनीं दिगन्तकीर्ति केलेल्या पुणें शहरांत माझें आज पंचवीस वर्षें वास्तव्य आहे. यामुळें त्यांच्याशीं माझें नगरबंधुत्वाचें नातें होतें. दुसरें नातें देशबंधुत्वाचें. हे दोन्ही संबंध बरेचसे अन्यसाधारण आहेत. लोकमान्यांशीं माझे दुसरेही अनेक संबंध होते. त्यांचा शिष्य होण्याचें भाग्य मला लाभलें. त्यांच्या मैत्रीचा स्पृहणीय मान मला मिळाला. पुण्याच्या न्यू. इं. स्कुलामध्यें मी एके कालीं अध्यापक होतों. त्यामुळें लोकमान्यांशीं माझा परंपरया सेव्यसेवक भाव होता. श्रीसरस्वतीमंदिरांतील एक अत्यंत नम्र परिचारक या नात्यानें लोकमान्यांशीं माझें सर्वांत लहान भावंडाचें नातें होतें. माझे वडील कै० ती० गणेशशास्त्री लेले हे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत महर्षि दादाभाई नौरोजी यांचे एलफिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्यें पट्टशिष्य होते; लोकमान्यही राजकारणशास्त्रांत महर्षींचेच कट्टे अनुयायी होते. अर्थात् तीर्थवंशसंप्रदायाप्रमाणें लोकमान्य माझ्या वडिलांचे गुरुबंधु व माझे पितृव्य होते. असे अनेक ऋणानुबंध असल्यामुळें लोकमान्यांच्या मृत्यूमुळें मला किती दुःख झालें असेल याची वाचकांनीं कल्पनाच करावी हें बरें ! लोकमान्यांशीं माझा व्यावहारिक संबंध जरी थोडा होता तरी जो होता तो विशेष जिव्हाळ्याचा होता. लोकमान्यांचा अभ्युदय व अस्त हे दोन्ही मीं पाहिले; व त्यांच्या दरम्यानचें त्यांचें चरित्र तर माझ्या मननाचा व अभ्यासाचा विषय होऊन बसलें होतें. पुण्यांतील कोणत्याही पक्षांत मी प्रत्यक्षपणें अभिनिवेशानें पडलों नाहीं. घडणाऱ्या गोष्टी दुरून पाहून त्याविषयीं स्वतंत्रपणें विचार करण्याची माझी

प्रवृत्ति असे. तरी माझें मन लोकमान्यांच्या भोंवतीं सारख्या घिरट्या घालणारें होतें. यामुळें त्यांची आकस्मिक निधनवार्ता ऐकून माझ्या मनाला मोठाच धक्का बसला! आपल्या घरांतील एकटा कर्ता पुरुष एकाएकीं नाहींसा झाला असतां जशी मनाची स्थिति होते तशीच लोकमान्यांच्या मृत्युवार्तेनें माझ्या मनाची स्थिति झाली. मी फारच उद्विग्न झालों! स्तंभ, प्रलय, मोह, संस्मृति, व प्रबोध या सर्व अवस्थांतुन माझ्या मनानें मोठ्या संकटानें प्रवास केला. प्रस्तुत लघुकाव्यें–तिलकाञ्जलि व त्याच्याच बरोबरची विरहगीति–हीं संस्मृतीच्या अवस्थेंत निर्माण झालीं. या अवस्थेंत भावनांचा उत्कर्ष असतो. प्रिय माणसाचा वियोग कितीही अप्रिय असला तरी तो केव्हांना केव्हां तरी पतकरावा लागतोच; परंतु त्याच्या स्मृतीचा विरह मात्र कोणीही पतकरीत नाहीं. मनुष्य मोठ्या प्रेमानें मृताचें पुन्हां पुन्हां स्मरण करून त्याचें गुणसंकीर्तन करितो. हा त्याचा स्वभाव आहे. मृताच्या स्मरणावर त्याचा हक्क आहे. तो कोणी हिरावून नेऊं शकत नाहीं. हा हक्क बजाविल्यानें मृताविषयींचें त्याचें दुःख हलकें होतें. मृताविषयीं आदर दाखवून तो त्याच्या ऋणांतुन मुक्त होण्याचा प्रयत्न करितो. त्यानें त्याला मोठें समाधान वाटतें. श्राद्धें, स्मारकें वगैरे प्रकार याच वृत्तीचीं निदर्शनें होत. लोकमान्यांची मूर्ति अन्तश्चक्षूपुढें उभी करून तिला मीं प्रेमाश्रूंनीं अनेकवार अभिषेक करून आत्मनिवेदन केलें आहे. तथापि मृताविषयींची आपली भावना शब्दांनीं व्यक्त करण्याची उत्कंठा-सुद्धां मनुष्याच्या ठिकाणीं निसर्गतः दिसून येते. लोकमान्यांविषयींचे असंख्य प्रेमालाप व शेंकडों वर्तमानपत्रांतील हजारों उल्लेख या भावनेचेंच फल होत. तिलकाञ्जलि व त्याच्या शेवटीं छापलेली विरहगीति हीं दोन्हीं लघुकाव्यें मीं याच भावनेनें लिहिलीं आहेत. तिलकप्रेम ही एकच भावना त्यांत प्रधान आहे. तिलक हा शब्द टिळक व तीळ या दोन्ही अर्थीं योजतात, म्हणून तिलकशब्दाची पुनरुक्ति न करितां प्रस्तुत काव्याला तिलकाञ्जलि हें नांव दिलें आहे. ता. ३१ माहे जुलै १९२० रोजीं रात्रौ सोलापूर येथें आकाश निरभ्र असून चंद्रप्रभा सुंदर पडली होती. लोकमान्यांच्या प्रकृतीला आराम वाटूं लागल्याची आनंददायक बातमी आल्यामुळें लोकांच्या मुद्रेवर आशायुक्त प्रफुल्लितपणा दिसत होता. पुढील भयंकर वादळाची थोडीदेखील कल्पना कोणालाही नव्हती. या देखाव्यापासूनच तिलकाञ्जलीस आरंभ केला आहे. हें लहानसें काव्य मीं तयार केलें खरें, तथापि प्रस्तुतच्या स्वरूपांत तें लोकांपुढें आणण्याचें सर्व श्रेय, लोकमान्यांविषयीं अत्यंत आदर व प्रेम बाळगणारे माझे परमप्रिय संबंधी ( भागिनेय ) चि. रा. रामचंद्र वासुदेव परांजपे, यांच्याकडे आहे. ही गोष्ट सदर गृहस्थांस जितकी भूषणास्पद तितकीच मला आनंददायक आहे. प्रस्तुत लघुकाव्य लोकमान्यांच्या आत्म्याचें संतर्पण करो! लोकमान्यांविषयीं प्रेम बाळगणाऱ्या वाचकांच्या कृपाकटाक्षासही तें पात्र होईल अशी आशा आहे.

स्टेशन–रोड, सोलापूर.
ता. १० आगस्ट इ. स. १९२०. } **लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.**

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य ८८०
ठाणे.

# तिलकाञ्जलि

कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक



"स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे, व तो मी मिळविणारच!"

बाळ गंगाधर टिळक.

९८९२
सं. क्रमांक २८०

# तिलकाञ्जलि

( पृथ्वीवृत्त )

अहा ! रुचिर तारका विलसताति नीलांबरीं[1].
निशारमण[2] सिंचितो अमृतबिंदु भूमीवरी.
प्रसन्नतम दिग्वधूवदनपंकजें[3] भासती.
प्रमोद्युत होउनी कुमुदिनी[4] वनीं हासती १

प्रशांतसमयीं अशा सकल लोक निद्रावश.
जणों पसरला जनीं मधुर शांतनामा[5] रस !
समाधिसुख भोगिती मुनि जितेंद्रिय स्वान्तरीं.
गमे मज मुनिव्रता जनसमाज हा आदरी. २

परंतु सहसा दुजे[6] रस उठोनियां भैरव[7]
धुळीस मिळवीति ते त्वरित शांतसद्वैभव[8] !
प्रभंजन[9] सुटे, नभीं प्रलयमेघमाला[10] उठे,
सहस्वन[11] तयांतुनी तरल चंचलाही[12] फुटे ! ३

घनस्तनित[13] भैरव प्रकट होय भूमण्डलीं.
कडाडुनि तडित्[14] तशी विकट[15] नृत्यकेली[16] करी.

१. निळ्या रंगाच्या आकाशांत. २. चंद्र. ३. दिशारूप स्त्रियांचीं मुखकमलें. ४. चंद्रविकासि कमलवल्ली. ५. शांत या नांवाचा नवरसांपैकीं एक रस. ६. भयानक, करुण असे दुसरे. ७. भयंकर. ८ शांतरसाचें मोठें ऐश्वर्य. ९. वादळ. १०. प्रळयकाळची मेघपंक्ति. ११. आवाजासहित. १२. वीज. १३. मेघगर्जना. १४. वीज. १५. मनसोक्त, भयंकर. १६. नृत्यक्रीडा.

प्रचण्ड रव उग्र तो दशदिशांसि नादावितो
प्रबुद्ध[1] करुनी जना बहु भयासि तो दावितो ४

" असे अशुभ काय हें ! कुठुनि काल हा पातला !
कठोर कलिकाल हा अतिकराल[2] कीं मातला ?
कळे न पुढतीं असे बहु अनर्थ तो कोणता.
प्रभो ! व्यसन[3] संहरीं. तुजविणें नसे रक्षिता. " ५

सुदीन जन हें असें वदति तोंचि चोहींकडे
कटु श्रवणभेदक[4] प्रकट वृत्त कर्णीं पडे !
" अहो ! भरतभूमिचा तिलक मोहरा लोपला !
प्रसिद्ध रवि बाल तो निघुनि जाय अस्ताचला[5] ! "६

अमंगल भयंकर प्रबल दुःखदात्री अशी
प्रवृत्ति[6] परिसूनियां स्तिमित सर्वही मानसीं !
तनूंप्रति जडत्व ये ! सकल कल्पना[7] भावना[8]
क्षणैक लय पावल्या, अहह ! सर्व संवेदना[9] ! ७

अशा स्थितिंत अलपसा निघुनि काल गेल्यावरी
हळू हळु जन स्वयें परत येइ वृत्तीवरी[10].
प्रबोध[11] गमला व्यथाकर[12] विशेष निद्रेहुनी !
विलापवश जाहला जन निजक्रिया[13] त्यागुनी. ८

---

१. जागृत. २. फार भयंकर. ३. संकट. ४. कान फोडणारें. ५. बालरवि अस्ताचलाला जाणें ही गोष्ट नेहमींपेक्षां विपरीत म्हणूनच आश्चर्यजनक असा ध्वनि. ६. बातमी. ७. विचार. ८. वृत्ति. ९. शारीरिक दुःखाची जाणीव. १०. मानावर. ११. जागृति. १२. दुःखदायक. १३. आपलीं नेहमींचीं कामें.

कुठें हृदय भंगुनी रुदन सारखें चालिलें.
कुठें नयननिर्गता सलिलबिंदुधारा गळे.
सगद्गद कुठें कुठें तिलक-कीर्तिसंकीर्तनें.
अधोवदनही कुठें जनकदंब[1] खिन्न मनें. ९

कुणासि गमला सखा परम बाल गंगाधर,
कुणासि गमला पिता तनयपालनीं तत्पर;
कुणी समजती तया स्वजननी महावत्सला[2],
अनाथ जन मानि त्या परम देवता मंगला. १०

प्रदीप वदती कुणी भरतभूमिचा मावळे,
कुणी म्हणति हा तिचा तुटुनि हार खालीं गळे.
कुणी समजती तिच्या तिलक भालिंचा लोपला,
स्वराज्यधृतकंकण[3] प्रथित[4] वीर आटोपला ! ११

स्वकंठमणिशून्य[5] ती वदति शारदा[6] जाहली,
कठोर करि कर्म हें कुटिल तो विधाता[7] बली !
पुण्यनगरिची, अहा ! सुकृतवल्लरी[8] वाळली !
अतां स्मृतिपथाप्रती प्रगतिची कथा पावली ! १२

विलाप असला जनीं करिति, लोकमान्या ! महा[9].
क्षणोक्षणिं तव स्मृति व्यथित त्यां करीते पहा !

---

१. लोकसमुदाय. २. फार दयाळु. ३. स्वराज्यप्राप्तीकरितां बांधलें आहे कंकण ज्यानें असा. ४. प्रसिद्ध, कसलेला. ५. स्वतांच्या गळ्यांतील रत्न नाहींसें झालें जिच्या अशी. ६. सरस्वती. ७. ब्रह्मा. ८. पुण्याची वेल. ९. महा विलाप इ. अन्वय.

परोपरि तुझे गुण स्तवुनि आठवीती तुला.
  दुज्या नाचि कुणासही तव यशोंऽशही[1] लाभला ! १३

अगा शुचितमव्रता[2] गुरुवरा उदारा नरा !
  तुझा विरहवह्नि हा कवळि माझिया अंतरा.
अगोदरचि देह हा बहु गदव्रजें[3] जर्जर,
  तशांत सहसा पडे निशित[4] वज्र हें त्यावर ! १४

तुझें निधन[5] पातलें जवळिं ही जरी कल्पना
  मला असति अल्पही, तरि अगा ! जगन्मोहना[6] !
मुदें परम आग्रहें विनवितों[7] तया ईश्वरा,
  ' मदीय हर्त[8] आयु हें वितरिं[9] बाल गंगाधरा ! ' १५

परंतु, तिलका, अहा ! चकविलें तुवां बांधवां
  जनीं नच कदापि वा प्रकटिलें अशा कैतवा[10] !
पुन्हां न तव दर्शन प्रकृतिरम्य वाटे घडे
  मनासि म्हणुनी अहर्निश कठोर चिंता जडे. १६

सुसज्ज[11] मन घ्यावया विरहवह्निकुंडीं उडी
  कृतार्थ समजेन मी जरि जळेल तेथं कुडी.
परी मजवरी करी नच कृतांत[12] दृक्[13] वांकडी !
  तयासि गमतें ' अशीं[14] सहज लभ्य होती मढीं ! ' १७

---

१. कीर्तीचा भागसुद्धां. २. अत्यंत पवित्र आचरण करणाऱ्या. ३. रोगांच्या समुदायानें. ४. तीव्र. ५. मृत्यु. ६. जगाला रंजविणाऱ्या. ७. विनविलें असतें. ८. निरुपयोगी. ९. दे. १०. कपटाला. ११. अगदीं तयार. १२. यम. १३. नजर. १४. माझ्यासारखीं.

ज्वरप्रशम[1] व्हावया बहु उपाय केले जनें.
मृषामरणवृत्तही[2] उठविलेंचि भोळया मनें !
कितीतरि करी अगा नवस आणखी प्रार्थना !
परी न करुणा तया अणुहि येइ नारायणा ! १८

समुत्सुक[3] तुम्हांकडे वरति[4] यावया हा जन.
परंतु पदरीं नसे सुकृत[5], कीर्तिचें भाजन.
निकृष्ट[6] *पशुवृत्ति हा, रत सदा तनूलालनीं[7].
तया अमरलोक[8] वा सुरतरंगिणी[9] कोठुनी ? १९

स्मरोनि गुण ते तुझे अमित मी इथें हा रडें,
तनू तळमळे अगा नयन होति हे कोरडे !
परंतु करिं काय मी अशुभ कृत्य हें या स्थलीं !
कधीं न तुज संमता[10] रुदनरीति[11] वा जाहली ! २०

त्वदर्थ धनिक स्वयें उठवितील सन्मंदिरें,
कवींद्र रचितील कीं तव कथानकें सुंदरें.
अकिंचन अविद्य मी तव कसें करूं स्मारक ?
विचार असला उभा हृदयिं धैर्यसंहारक[12]. २१

अपार हृदयीं परि प्रणयसिंधु[13] हेलावला !
खरा धनिक मीच कीं ! अलघु[14] लाभ हा जाहला !

---

१. तापाची शांति. २. खोट्या मरणाची कंडी. ३. फार उतावीळ. ४. स्वर्गाला. ५. पुण्य. ६. अधम. ७. शरीराचे चोचले करण्यांत. ८. देवलोक; स्वर्ग. ९. गंगा, भागीरथी. १०. मान्य. ११. रडण्याची पद्धत, रडगाणें. १२. धैर्याचा लोप करणारा. १३. प्रेमसागर. १४. मोठा.
* पशुसारखें वागणारा.

असे प्रणयवस्तु[१] ही विमल दिव्य संमोहिनी,
हिच्याच विभवामुळें सुख विराम शांती जनीं  २२

सख्या ! असशि तूं कुठेंतरि सुदूर लोकान्तरीं[२]
तुला प्रणयरश्मिनीं[३] उतरवीन मी भूवरी.
वळेहि परमेश्वर प्रणयरज्जुनीं[३] बांधिला.
कसा न, पुरुषोत्तमा ! प्रणयवश्य[४] होशी मला ?  २३

तुझ्या चरणधूलिकेमधिं यथेच्छ मी लोळुनी
त्वदीय तनु संभ्रमें[५] करिं धरीन आकर्षुनी.
जपूनि बसवीन ती हृदयरूप सिंहासनीं
न जाइल तिथोनियां निसटुनी मनोनंदिनी[६].  २४

जनांत अभिषिंचिती अखिल भक्त गंगाधरा[७],
असेल उपचार[८] तो प्रिय तदात्मजाला[९] खरा;
म्हणोनिच तयावरी धरिन बाष्पधारा सदा.
नुपेक्षिन तयास मी प्रियतमा नृसिंहा[१०] कदा.  २५

सुरेंद्रभवना[११] झणीं त्यजुनि जासि कैसा जना ?
स्वयत्नफल लाभलें सकल काय वाटे मना ?
शिवास[१२] गड[१३] लाभला जरि पडे गडी[१४] मावळा !
स्वराज्य आणि त्यासवें अम्हिं गमाविला मोहरा !  २६

---

१. प्रेमरूप चीज. २. अन्य लोकांत, परलोकीं. ३. प्रेमाच्या दोऱ्यांनीं. ४. प्रेमाला वश. ५.लगबगीनें.६.मनाला आनंद देणारी.७. शिवाला. लोकमान्यांच्या वडिलांचें नांव तेंच होतें. ८. पूजा,सत्कार. ९. गंगाधरतनयाला अर्थात् आपणांस. १०. नरश्रेष्ठाला. ११. स्वर्गाला. १२. श्रीशिवाजीमहाराजांस. १३. सिंहगड. १४. तानाजी.

प्रदीप[1] लघुदीपकां द्युति[2] निज स्वयें अर्पितो,
उणा न पडतां कधीं परम दीप्तिनें[3] राजतो.
स्वकीय विखरीशि[4] तूं किरणजाल[5] लोकामधें
तयासि नवजीवना वितरितोसि,[6] तेजोनिधे ! २७

वनीं महित[7] चंदनद्रुम महीतलीं राजतो,
न आत्मनिरपेक्ष[8] त्यासम दुजा जनीं गाजतो.
परी परिसुनी तुझें चरित तो उदार[9] स्वयें
त्वदन्तसमयीं तुझ्या चरणसेवनालागिं ये ! २८

अगा ! विविध गंध ते मृगमदादि[10] पृथ्वीवरी
निजें भरिति सौरभें[11] दशदिशां पहा सत्वरीं.
यशःपरिमलें[12] तुझ्या बहुत अंतरीं लाजुनी
तुझ्यावरुनि टाकिती निजतनूंसि ओंवाळुनी ! २९

नृपालपद[13] लाभलें तुजसि राजचिह्नांविणें
खरें सफल जाहलें तव, नरप्रवीरा ! जिणें.
तुला जन मनोमय स्थिर विशाल सिंहासना
समर्पुनि करी तयावरि तुझी प्रतिष्ठापना ! ३०

---

१. मोठा दिवा. २. प्रकाश. ३. मोठ्या तेजानें. ४. पसरिशी. ५. किरणांचा समूह. ६. नवीन जीवन देतोस. ७. मान्य. ८. जीवाची पर्वा न करणारा. ९. 'उदार' हें 'चरित' याचें विशेषण. लोकमान्यांच्या अन्त्यविधीला चंदनकाष्ठें मिळालीं या गोष्टीला अनुलक्षून हें पद्य आहे. १०. कस्तुरीवगैरे. ११. सुगंधानें. १२. कीर्तीच्या वासानें. अनेक सुगंधि द्रव्यें लोकमान्यांच्या शवावर टाकिलीं या गोष्टीकडे येथें लक्ष्य आहे. १३. राजपद.

जनावरि धरीसि तूं निजकृपातपत्र[1] स्वतां,
किरीटधर[2] कांपती तव विभूतिला[3] पाहतां.
कशासि तुजला हवीं मुकुटछत्रचिह्नें, अगा !
तयांविणचि फार तूं दिससि थोर साऱ्या जगा. ३१

करी मृदुल[4], राधिकारमण[5], रम्य वेणुध्वनी
समाधिरत[6] हो तदा मनुजवृन्द[7] वृन्दावनीं[8].
स्वराज्य-मुरलीरव प्रकटला तुझा, तेधवां
जनावरति मोहनी पडलि सत्यभामाधवा[9] ! ३२

तुझें, जनमनोहरा ! परम भाग्य, बापा, कुठें !
मदीय बल बुद्धिचें प्रतनु[10] सांग तेवीं कुठें !
तथापि मनिं कल्पना उठति त्यांसि वारूं[11] कसें ?
तुझ्या गुणगणाकडे सकल दोष याचा असे ! ३३

प्रशांततनु शंतनुप्रथितपुत्र[12] शय्येवरी
पडे, द्युमणि[13] अम्बरच्युत[14] जणों धरित्रीवरी !
तया समयिं तत्तृषा[15] झणिं धनजयें हारिली,
सुखें मग पितामहें[16] स्वतनु भंगुरें[17] त्यागिली. ३४

---

१. आपल्या कृपेचें छत्र. २. मुकुटधारी राजे. ३. ऐश्वर्याला. ४. मृदु. ५. कृष्ण. ६. तल्लीन. ७. लोकसमुदाय. ८. गोकुळाजवळ असणाऱ्या प्रसिद्ध वृंदावन—प्रदेशांत. ९. सत्यभामेच्या प्रिया, लोकमान्या. १०. अत्यल्प. ११. दूर करूं. १२. शंतनूचा विख्यात मुलगा, भीष्म. १३. सूर्य. १४. आकाशांतून गळून पडलेला. १५. भीष्माची तृष्णा अर्जुनानें शांत केली अशी कथा आहे. १६. कौरवांच्या आजानें, अर्थात् भीष्मानें. १७. नश्वर.

स्वराज्यसुखतृष्णिका तुजसि फार कष्टी करी.
अतृप्त तव वासना तशिच राहिली अंतरीं.
तुला न कुणि भेटला कसुनि कास सांगावया
' सुसज्ज[2] तव कार्य मी मम शिरावरी घ्यावया. ' ३५

स्वदेशरिपुमंडला[3]पुढतिं मंडलें[4] घेउनी
विशस्त्र[5] असहाय[6] तूं झगडलासि रात्रंदिनीं.
तुझें बघुनि कर्म हें कठिन धैर्य मोठें तसें
प्रवीर[7] अभिमन्यु तो स्मृतिपथासि कीं येतसे ! ३६

अगा ! झगडतां तनू तिजसि शीण आला महा,
पडे गलित होउनी शयनिं काल कांहीं पहा ।
स्वराज्य रसने[8]वरी ! सतत तेंचि नेत्रांपुढें !
अनन्याविषया[9] स्मृती ! हृदय चिंतुनी[10] तें उडे ! ३७

स्वलाभ[11], भय, दीनता[12], अलसता[13], निराशा, भ्रम;
महान् षडरिवर्ग[14] हा तव न खंडि[15] कार्यक्रम[16].
स्वराज्य, जनताहित[17], स्थिर अकामकर्मोद्यम[18];
त्रिकाण्डमय[19] हा तुझा अमरकोश[20] कोशोत्तम[21] ! ३८

---

१. स्वराज्याच्या सुखाची तहान. २ एका पायावर तयार. ३. स्वदेशाच्या द्वेष्ट्यांच्या समुदायापुढें. ४. चक्राकार फिरून. ५. शस्त्ररहित. ६ एकटा. ७. महावीर, कसलेला योद्धा. ८. जिभेवर. ९. दुसरा विषय जिला नाहीं अशी. १०. (स्वराज्याचें) ध्यान करून. ११. स्वार्थप्राप्ति. १२. दैन्य. १३. आळस. १४. सहा शत्रूंचा समुदाय. १५. मोडिता झाला. १६. आंखलेलीं अथवा योजिलेलीं कामें. १७. सर्व लोकांचें कल्याण. १८. निर्लोभपणानें उद्योग करण्याचा स्वभाव. १९. तिसऱ्या चरणांत दर्शविलेल्या तीन गोष्टींनीं भरलेला. २० कायम टिकणारा कोश. सुप्रसिद्ध त्रिकांड अमरकोशही ध्वनित होतो. २१. सर्व कोशांत श्रेष्ठ.

गती तशिच लाभते जसि असेल अंतीं मती,
  जनामधिं कधीं कधीं कवि असें सुधी बोलती.
म्हणोनि मज वाटतें परतशील पूर्वालया[1]
  मनोरथ अपूर्ण तो सकल सिद्धिला न्यावया ! ३९
'स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ?'[2]
  मयूरकवि बोलला प्रभुवरा[3] असें सन्मती.
मलाहि गमतें, सख्या ! तव गुणांसि वानावया
  कवीन्द्र[4] जानिं पाहिजे तुजसमान जन्मावया. ४०
स्वराज्य मिळवावया करिं सुशस्त्र व्हावें नवें
  म्हणोनि अमरालया[5] निघुनि जासि मोठ्या जवें;
कितीक जन मानसीं करिति तर्क, बापा ! असा.
  प्रभाव न तयां कळे तव विभूतिचा फारसा. ४१
मति प्रचुर[6] सूक्ष्म[7]ही विशद[8] विश्व[9]संचारिणी,
  स्वराज्यरसवर्षिणी सुरसना[10] मनोहारिणी;
विपक्ष[11]मतखंडिनी विजयशालिनी लेखनी,
  सदा हृदयिं भावना[12] स्वजन[13]भाग्यसंवर्धिनी. ४२
अशीं निशित[14] आयुधें विलसलीं तुझ्या तूणिरीं[15]
  अमोघ[16] गमलीं मला सकल रामबाणापरी.

---

१. पहिलें घर, अर्थात् इहलोक, महाराष्ट्र. २. मयूर कवीच्या केकावलींतील हा एक चरण आहे. ३. देवाला. ४. महाकवि, कविश्रेष्ठ. ५. स्वर्गाला. ६. पुष्कळ, मोठी. ७. बारीक पाहणारी. ८. भ्रांतिरहित. ९. सगळें जग पाहणारी. १०. चतुर जीभ. ११. उलट पक्षाच्या मताचें खंडन करणारी. १२. विचार, इच्छा. १३. आपल्या लोकांचें वैभव वाढविणारी. १४. तीक्ष्ण १५. भात्यांत. १६. हटकून काम करणारी.

तयांमधुनि एकही क्षमाचि[1] कार्य साधावया
जरी मिळति सर्वही तरि नकोचि बोलावया. ४३

महर्षि, मुनिपुंगवव्रज[2], यतीन्द्र[3], धर्मादिक[4],
सुरेन्द्र[5], मनुजाधिप[6], प्रथित[7] कृष्ण कंसान्तक;
असे सकल पातले त्यजुनि अन्य कार्यें स्वतां
ससंभ्रम नमावया शयनलीन[8] गंगासुता[9] ! ४४

स्वदेशहितसाधक, प्रथित[10] पंडित, प्राकृत[11],
वणिग्जन[12], भिषग्वर, प्रिय सुहृत्, नयज्ञ[13] श्रुत.
यतीन्द्र[14] करवीरचे प्रगुण[15] कुर्तकोटी भले[16]
द्विज प्रयत[17]ही तुझ्या सकल दर्शना धांवले ! ४५

पुण्यांतिल मुळातटावरि तनूसि न त्यागिसी,
तुझ्या विमलमूर्तिला कुसरिता[18] रुचे ती कसी ?
नद्या नद मिळूनि ज्यामधिं विलीन होती वर[19]
असा वरियला तुवां अखिलतीर्थराट्[20] सागर ! ४६

जनीं वदति कीं वळे सहज थोर थोराकडे
खरेंचि वचनांत या परम सत्य दृष्टी पडे.

---

१. समर्थ. २. मुनिश्रेष्ठांचा समुदाय ३. महायोगी. ४. धर्म वगैरे पांडव. ५ देवश्रेष्ठ, इंद्र. ६. राजे. ७. विख्यात. ८. शय्येवर पडलेल्या. ९. भीष्माला. १०. सुप्रसिद्ध. ११. सामान्य लोक. १२. व्यापारी वर्ग. १३. राजकारणी लोक. १४. कोल्हापूरचे श्रीमच्छंकराचार्य. १५. गुणसंपन्न १६. साधुवृत्तीचे. १७. वेदाध्ययनानें पवित्र. १८. वाईट नदी. १९. श्रेष्ठ ( नद नद्या ). २०. सर्व तीर्थांचा राजा.

सुरत्ननिचयासि[1] तो[2] धरि म्हणोनि रत्नाकर.
प्रसिद्धगुण[3]रत्न तूं म्हणुनि तूंहि रत्नाकर[4] ! ४७
तुझ्या भवनिं खेळती धवल वंद्य गंगा[5]जळें,
त्वदीय यमुना-नदीसम शरीर तें सांवळें;
तुझ्या हृदयपंकजीं बहु सरस्वती शोभली,
*त्रिवेणिनवसंगमें तुज अपूर्वता लाभली ! ४८
स्वराज्य भिनलें तुझ्या मधुर रोमरोमान्तरीं,
स्वदेश[6]रति एवढी प्रकटली न अन्यस्थलीं.
न आत्म[7]यजनीं तुझ्यासम समर्थ कोणी दिसे.
असा त्रिगुण[8]संगम स्थिर तुझ्याचि ठायीं असे ! ४९
ज्वरो[9]पहत टाकिली तनु तुवां क्षण[10]ध्वंसिनी
नभःसलिल[11]मारुतज्वलन जाति ती सोडुनी.
मृदंश[12] उरला तुझा त्वरित भस्मरूपा धरी;
तयांतुनि पुन्हां उभा तिलक[13] लोकभालावरी ! ५०

---

१. उत्तम रत्नांच्या समुदायाला. २. जनांत ठाऊक असलेला. ३. प्रसिद्ध आहेत गुणरूप रत्नें ज्याचीं असा. ४. रत्नांची खाण; श्लेषानें रत्नाकर ( समुद्र ).५. तुझे वडील गंगाधर म्हणजे गंगा धारण करणारे; अतएव गंगा तुझ्या घरचीच असा भाव. ६. स्वदेशाविषयीं प्रेम. ७. स्वार्थत्यागांत. ८. तिसऱ्या चरणांत सांगितलेल्या तीन गोष्टींचा योग. ९. तापानें पछाडलेली. १०. नश्वर. ११. आकाश, उदक, वायु व अग्नि. १२. पृथ्वीचा अंश. १३. लोकमान्यांच्या देहाच्या रक्षेचा तिलक जनतेनें भालीं लावून त्यांस वंदन केलें या गोष्टीकडे येथें लक्ष्य आहे. देह पंचभूतांशिवाय निष्पन्न होत नाहीं. लोकमान्य तिलक केवल पार्थिव अंशांतून पुन्हां उत्थित होऊन लोकभालावर तिलकरूपानें विराजित झाले हें आश्चर्य ! *त्रिवेणीचा नवीन संगम. त्रिवेणीचा जुना संगम प्रयागक्षेत्रीं आहे.

न वस्तु दुसरी तुला प्रियतमा स्वराज्यापरी.
जिवंत असतां तुला परि न ती मुळीं लाभली !
सतृष्ण तव जीव, बा ! तळमळे उदारा किती !
तदर्थ[१] जणुं आचरी तपाचि सिंधुच्या सैकतीं[२] ! ५१

त्वदीय विरहें अगा, सकल लोक दुःखी असे,
त्यजी नयनवारितें नवल यांत कांहीं नसे.
अचेतनहि सृष्टि ती अतिविषण्ण[३] होई मनीं
निज प्रकटवी व्यथा सजलमेघ[४]धाराश्रुंनीं ! ५२

त्वदस्थिंस तुझी तनू कुशलकारिणी लाभली,
त्रिवेणिहुनिही[५] तयां विमल फार ती वाटली.
निराश्रय जिणें नको म्हणुनि जाति दूरीं अतां
प्रयागनुत[६]संगमीं जळसमाधि[७] घेती स्वतां ! ५३

त्यजोनि निजमंदिरा निघुनि जासि मुंबापुरा,
प्रवास इहलोकिंचा तव न संपला वाटला.
अकल्पिताचि जाहलें निधन ! हाय ! बोले धरा[८]
निजा[९] परतलासि तूं अहह ! अस्थिरूपें घरा ! ५४

---

१. स्वराज्याकरितां. २. समुद्राच्या वाळवंटांत. ३. फार दुःखी. ४. काळ्या कभिन्न ढगांतील धारांच्या अश्रूंनीं. लोकमान्यांच्या प्रयाणसमयीं मोठी पर्जन्यवृष्टि होत होती तिच्यावर ही कल्पना. ५. प्रसिद्ध त्रिवेणीसंगमाचा धिक्कार केला असा भाव. ६. प्रयाग येथील पवित्र संगमावर. ७. तोंड दाखवायाला कोठें जागा नाहीं म्हणून दूरवर प्रयागाला जाऊन जळसमाधि घेतली असा अभिप्राय. ८. पृथ्वीवरील लोक, हाय ! म्हणून रडूं लागले. ९. 'निजा घरा' असा अन्वय.

स्वतांपरिस आश्रितांविषयिं काळजी वाहसी,
  तुझ्या चरितचिंतनें कळुनि गोष्ट येई अशी.
तुझ्याहुनिहि आस्थिची तव जनांत हो मान्यता
  रुचेल तुज कृत्य हें खचित वाटतें तत्त्वतां. ५५

पहा सकल विश्व हें झणिं रवीन्दुंच्यां[1] संगमीं
  निराश्रय निराशसें बुडुनि जाय सांद्रीं[2] तमीं !
परंतु नवजीवनप्रद[3] रविप्रभा भास्वर[4],
  प्रभातिं उदयासि ये पुनरपि प्रमोदाकर[5] ! ५६

प्रचंडकर[6] लोपसी भरतखंडमार्तंड[7] ! हाँ[15] !
  पुन्हां न पडशील तूं मनुजदृष्टिलागीं पहा !
म्हणोनि जन संकटीं पडुनि मूढ झाले असे !
  जणों विकल[8] नष्टदृक्[9] बधिर मूक[10] वेडेपिसे ! ५७

दिवंगत[11]चि तूं ! परी बघुनि आमुच्या यातनां
  सुरेंद्रभवनींहि बा ! स्थिति[12] रुचेल न त्वन्मना.
कधीं तरि धरूनियां प्रकटशील रूपान्तरा[13],
  असे भरंवसा मला शमविशील लोकान्तरां[14]. ५८

तुझें निधन जाहलें प्रसृत वृत्त ऐसें, अहा !
  अनंत इतुक्यांत मी बघतसें चमत्कार, हाँ[15] !

---

१. सूर्य व चंद्र हे एका गृहीं येतात तेव्हां; दर्शाच्या दिवशीं. २. दाट. ३. नवीन जीव देणारी. ४ लखलखीत. ५. आनंदाची खाण. ६. तीव्र आहेत ज्ञानरूप किरण ज्याचे असा. ७ भरतखंडाचा ज्ञानसूर्य. ८. अंगभंग झालेले. ९. आंधळे. १०. मुके. ११. खचित स्वर्गाला गेला आहेस. १२. राहणें, वसाति. १३. अन्यरूप ( धरूनियां ). १४. जनाच्या अंतःकरणांला. १५ हाय हाय !

भया न भय वाटतें, परम धीट तें जाहलें
न धैर्य धरि धैर्यही ! शरण तें भया पातलें ! ५९

निजासन[1] जनामधीं हुडकि शारदा माउली,
स्वराज्यपरिषद्[2] तशी स्वपति धुंडि राष्ट्रान्तरीं[3] !
न नायक कुणी असे विबुधमंडली चावळे,
न नीतिपथदर्शनीं[4] निपुण एकही आढळे ! ६०

हताश[5] जनिं वावरे स्थल न कर्मयोगा[6] मिळे !
समुद्यम[7] सुदीर्घ[8] तो निरवलंब[9] दूरीं पळे !
स्वयज्ञविषया[10] कथा स्मृतिपथा अतां पातली !
न निग्रह दिसे कुठें म्हणुनि इंद्रियें मातलीं ! ६१

न देव धरि मानसीं लवहि भेदभाव स्वयें,
पहा सकल सृष्टिला सतत वागवीतो नयें.
तुवांहि अवधारिलें परम आदरें तत्पथा,
म्हणोनिच जना तुझ्या रुचति फार साऱ्या कथा. ६२

त्वदीय रिपुवर्गही तव गुणांसि वाखाणितो,
चरित्र सगळें तुझें विमल तेविं सम्मानितो.
कधीं कधिं तुझ्यामधें ठळक दोष त्या आढळे.
वदे[11] प्रकट होय तो तव गुणातिरेकामुळें[12] ! ६३

---

१. आपलें बसावयाचें ठिकाण. २ राष्ट्रीय सभा. ३. हिंदुस्थानांत. ४. राजकारणाची दिशा दाखविण्याला. ५ निराश झालेला. ६. कर्मयोगाला आधार मिळत नाहीं म्हणून तो जगांत निराशेनें भटकत आहे असा भाव. ७. चांगला उद्योग. ८. चिकाटीचा. ९. आधाररहित. १०. स्वार्थत्यागासंबंधाची. ११. याला रिपुवर्ग हा कर्ता. १२. गुण मर्यादेपलीकडे गेल्यामुळें.

ज्वलज्[१]ज्वलनसंगमें कनक पूर्ण लागे कसा,
प्रभाव तव संकटीं प्रकट होय, बापा ! तसा.
तुझें चरित दर्शवी, तुजसि त्या सुवर्णापरी
अतिप्रखर घर्षण[२]प्रमुख [३]संस्कृती जाहली ! ६४

[४]अचेतनें तुझी तनू सकल राष्ट्र [५]मांझी वदे.
[६]सगौरवें नमावयां तव [७]समुत्सुक श्रीपदें;
जवें थडकले किती दुरुनि राज[९]धानीप्रती !
धरूनि निजमस्तकीं तव [१०]शवास्थिनां वंदिती ! ६५

दुहोनि [११]यदुनंदनें [१२]उपनिषन्महाधेनुतें
पृथा[१३]तनय [१४]तर्पिलें विमल[१५]वत्स [१६]गीतामृतें.
तुवांचि तदनंतर प्रथम त्याचि गीतामृता
जनाप्रति समर्पिलें मथुनि [१७]कर्मदण्डें स्वतां ! ६६

[१८]वटोदरिं पडे [१९]सखा विपदिं[२०] तेधवां धांवसी,
[२१]निजाप्तवरदत्तका स्वपदिं विक्रमें स्थापिसी;

---

१. धगधगीत निखाऱ्याच्या साहचर्यानें. २. घर्षण, च्छेदन, ताप आणि ताडन. ३. संस्कार. ४. जड, मृत. ५. आपली स्वतांची. ६. आदरानें. ७. फार उतावीळ ( राष्ट्राचें वि० ). ८. लक्ष्मीयुक्त अर्थात् भाग्यवान् चरणांना. ९. मुंबईला. १०. मृतदेह व अस्थि यांना. ११. श्रीकृष्णानें. १२. उपनिषद् याच कामधेनूला ( दुहोनि ). १३. अर्जुन. १४. तृप्त केला. १५ पवित्र बालक (अर्जुन). १६. गीतारूप अमृतानें. १७. कर्मयोगाला प्राधान्य देऊन. १८. बडोद्यास. १९. कै. वासुदेवराव बापट. २०. संकटांत. २१. आपले आप्तश्रेष्ठ कै. बाबा महाराज यांचे दत्तपुत्र श्रीजगन्नाथमहाराज यांस.

स्वधर्मविषयीं[1] कधीं न परशासन[2] प्रार्थिसी,
समाजनवबन्धनीं[3] बहुमतासि सम्मानिसी. ६७

शिवाजिचरितामृतें जनमनांसि तूं सिंचिलें,
स्वराज्यरतिबीज त्यामधिं तुवांचि कीं लाविलें.
शिवां[4] स्तवुनि दाविलें जनिं विभूतिपूजापथा.[5]
सख्या ! जन तुझ्या अशा विसरतील कैशा कथा ?

समर्थ खलदण्डनीं, दुरितखंडनीं[6] पण्डितां,[7]
अनर्थमर्ददन्तिची[8] शमवि[9] गंडकंडू स्वतां;
प्रबोधजननी[10] महाविजयशालिनी मालिनी[11]
समुद्धारिसि[12] मूर्ति[13] ती विमल अंबिकानंदिनी[13] ! ६९

न मानसविहंगमा[14] ! तुजसि हो प्रवासश्रम;
अबाधित तुझा असो सहजकर्मयोगक्रम.[15]
क्षुधा तशि तृषाहि ती तुज पथामधीं लागली
तयांसि तरि आमुचा प्रशमवील[16] बाष्पांजली ! ७०

---

१. धार्मिक बाबतींत २. अन्यधर्मीयांचे हुकूम, कायदे. ३. नवीन सामाजिक बंधनाच्या कामीं. ४. शिवाजी महाराजांना. ५. विभूतिपूजेचा मार्ग ( Hero-worship ). ६. पातकांचा नाश करण्याच्या कामांत. ७. कुशल. ८. विघ्नरूप मदोन्मत्त हत्तींची. ९. गंडस्थळाची कंड जिरवी; गंडस्थलें फोडून टाकी इत्यर्थ. १०. ज्ञान उत्पन्न करणारी, जागृति देणारी. ११. सुंदर. १२. पुन्हां प्रचारांत आणिशी. १३. पार्वतीला आनंद देणारी मूर्ति अर्थात् गजानन. १४. मानससरोवरावरील पक्ष्या ! राजहंसा ! पक्षीं लेखकाच्या मनांत घिरट्या घालणाऱ्या विहंगमा ! १५. जन्मसिद्ध कर्मयोगाचा प्रचार. १६. शांत करील.

तव स्मरण संतत स्फुरणदायि[1] आम्हां घडो,  
त्वदीय गुणकीर्तनध्वनि सुरम्य कर्णीं पडो.  
स्वदेशहितचिंतनाविण दुजी कथा नावडो  
तुझ्यासमचि आमुची तनुहि देशकार्यीं पडो ! ७१

अगा प्रभुवरा ! तुवां तिलक मोहरा हारिला !  
कळे न मज हेतु तूं हृदयिं काय संधारिला[2].  
तदीय तनु आवडे तुजसि ? बैस ती घेउनी !  
अम्हां अनुगृहीत[3] तूं करिं तदीय[4] तेजें झणीं. ७२

---

## विरहगीति.

( भूपाळीची चाल )

बलवंता ! गंगाधरतनया ! तिलका ! भामाधवा[5] !  
दुःखाम्बुधिमाधिं[6] लोटुनि जासी सांग कुठें बान्धवां[7] ?  
मागें राधारमण[8] वेणु निज वाजवि वृन्दावनीं,  
श्रवणमधुर त्या नादें जाती जीव सकल मोहुनी.

स्वराज्यमुरलीनाद रम्य तव रंजवि तेवीं जना.  
पुनरपि परिसविं रव मंजुल तो, जनपदसंजीवना[9] !

---

१. जागृति अथवा उत्तेजन देणारा. २. योजिला. ३. कृतार्थ, धन्य, कृतकृत्य. ४. लोकमान्यांच्या. ५. भामा—सत्यभामा, हें लोकमान्यांच्या पत्नीचें नांव आहे; हे लोकमान्या. ६. दुःखसागरांत. ७. देशबंधूंना. ८. श्रीकृष्ण. ९. लोकांमध्यें चैतन्य ओतणाऱ्या.

ज[1]नतेकरितां प्राणांची त्वां आहुति दिधली भली !
अन[2]न्यसाधारण पदवी तुज ' लोकमान्य ' लाभली.

महाराष्ट्रीचा अन[3]भिषिक्त तुज राजा म्हणती जनीं.
या सन्माना पात्र न झाला आजवरी नर कुणी.
मुकुटचामरच्छत्र [4]लांछनें लोकीं जे मिरविती,
तव वैभव ते बघुनि कांपती, भीति मनीं धरिती !

तव सिंहासन विशाल सुंदर लोकमानसीं वसे,
प्रेमजलाचा अभिषेकहि तव संतत शिरिं होतसे.
रुचिर शारदा[5]कण्ठमणी तूं झळकलासि नरवरा !
पंडित[6]मंडल मंडित केलें मान्यतमा बुधवरा !

वीर[7]वृत्ति तव भीरुजना[8]ला धीर देइ सर्वदा.
विक्रम दावुनि तुवां खंडिलें अधिकाऱ्यांच्या मदा.
स्वदेशसेवा स्वार्थत्याग स्वराज्य यांवांचुनी
कधीं न तिलका ! त्रिभुवन[9]तिलका ! किमपि आणिलें मनीं.

श्रीगंगेच्या विमल जलापरि शील धवल शोभलें.
तव कीर्तीला विहरायाला त्रिभुवनहि न पुरलें !
अखंड उद्यम, मित्रप्रेम; स्वाश्रितहितचिंतन
अमित गुण तुझे, करूं तयांचें केवीं संकीर्तन ?

---

१. लोकांकरितां. २. अद्वितीय. ३. अभिषेकाशिवाय असलेला. ४. मुकुट, चवऱ्या, छत्र हीं राजचिह्नें. ५. सरस्वतीच्या कंठांतील रत्न. ६. विद्वानांचा समाज. ७. वीराला शोभणारा स्वभाव, आचरण. ८. भिऱ्या लोकांना. ९. तिन्हीं भुवनांतील श्रेष्ठ पुरुषा !

त्रैलोक्याचा दीप दिनमणी[1] जासी लोकान्तरा,[2]
अंधकार हा पहा मातला ! घाबरवी अन्तरा.
नयनवारिनें भरुनि तिलांजलि, तिलका ! तुज अर्पितो,
देशोद्धारा अवतर पुनरपि लक्ष्मण[3] हें प्रार्थितो.

---

१, सूर्य. २. अन्य लोकाला, स्वर्गाला. ३. प्रस्तुत पद्यें रचणारा ( लोकमान्यांचा नम्र सेवक. )

REFBK-0001812
REFBK-0001812
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 9892